पुढारी

# विधी अभ्यासक्रमाचा २६ ऑगस्टचा 'इंटिलेक्चुअल पॉपर्टी'चा पेपर रद्द

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत विधी अभ्यासक्रमाचा २६ ऑगस्ट रोजी होणारा 'इंटिलेक्चुअल पॉपर्टी' विषयाचा काही अपरिहार्य कारणास्तव पेपर रद्द करण्यात आला आहे. हा पेपर आता २९ ऑगस्ट रोजी दुपारी १ ते २ या सत्रात घेण्यात येणार आहे. पेपर रद्द केल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

तरूण भारत

# 'इंटिलेक्चुअल प्रॉपर्टी राईटस्'चा पेपर सोमवारी

- विधी सेमिस्टर ६ व १० च्या विद्यार्थ्यांच्या तक्रारीनंतर २६ जुलैचा झालेला पेपर रद्दबातल
- गैरहजर विद्यार्थ्यांची पुर्नपरीक्षा होणार नाही

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विधी अभ्यासक्रमाचा २६ जुलै रोजी 'इंटिलेक्चुअल प्रॉपर्टी राईटस्' हा पेपर झाला होता. या पेपरला पाच प्रश्न चुकीचे होते, अशी तक्रार विद्यार्थ्यांनी केली होती. त्यामुळे हा पेपर तांत्रिक आणि अपरिहार्य कारणामुळे रद्दबातल करून पुन्हा २९ ऑगस्ट रोजी दुपारी १ ते २ या वेळेत नव्याने होणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत तीन वर्षाच्या विधी अभ्यासक्रमातील सेमिस्टर सहा व पाच वर्षाच्या विधी अभ्यासक्रमातील सेमिस्टर दहाचा २६ जुलै रोजी 'इंटिलेक्चुअल प्रॉपर्टी राईटस्' हा पेपर झाला होता. या पेपरमधील पाच प्रश्न चुकीचे आहेत, अशी विद्यार्थ्यांची तक्रार आहे. त्यामुळे सरसकट १० गुण न देता पुन्हा परीक्षा घेण्याचा निर्णय अधिकार मंडळाने घेतला आहे. या निर्णयानुसार 'इंटिलेक्चुअर प्रॉपर्टी राईटस्' हा पेपर २९ रोजी दुपारी १ ते २ या वेळेत होणार आहे. या परीक्षा सांगली, सातारा, कोल्हापूरमधील ७ परीक्षा केंद्रांवर होणार आहेत. परीक्षा केंद्रांनी या परीक्षेच्या ओएमआर शीट तत्काळ सीलबंद करून कॅप विभागाव्दारे विद्यापीठाकडे पाठवायच्या आहेत. तसेच या पेपरला गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची पुन्हा पुर्नपरीक्षा घेण्यात येणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

पुण्यनगरी

# 'लॉ'चा पेपर होणार पुन्हा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातर्फे २६ जुलै रोजी घेण्यात आलेला विधी अभ्यासक्रमाचा 'इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी लॉ' हा पेपर परीक्षा विभागातर्फे रद्द करण्यात आला आहे. हा पेपर पुन्हा २९ ऑगस्ट रोजी घेण्यात आला आहे, अशी माहिती परीक्षा विभागातर्फे देण्यात आली आहे.

हा पेपर दि. २९ ऑगस्ट रोजी दुपारी १ ते २ या वेळेमध्ये घेण्यात येणार आहे. परीक्षेस गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा होणार नाही.

लोकमत

# विधि अभ्यासक्रमाचा २६ जुलैला घेतलेला पेपर रद्द

## विद्यापीठाचा निर्णय : सोमवारी पुनर्परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तांत्रिक कारणामुळे विधी अभ्यासक्रमातील बौद्धिक संपदा कायदा (Intellectual property law) या विषयाचा २६ जुलै रोजी घेतलेला पेपर शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने रद्द केला आहे. या पेपरसाठी सोमवारी (दि. २९) दुपारी १ ते २ या वेळेत पुनर्परीक्षा घेतली जाणार आहे.

या पेपरमध्ये अभ्यासक्रमाबाहेरील पाच प्रश्न असल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली. परीक्षा मंडळाने त्याची चौकशी केली. पेपर सेटरकडून माहिती मागविली. त्यांनी पुराव्यासहित प्रश्न बरोबर असल्याची माहिती परीक्षा मंडळाला सादर केली. काही विद्यार्थ्यांनी प्रश्न बरोबर असल्याचे सांगितले. विद्यार्थी आणि पेपर सेटर याची बाजू समजून घेतल्यानंतर या पाच प्रश्नांना सरसकट गुण देणे विद्यापीठाला संयुक्त वाटले नाही.

सर्व विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सोमवारी ऑफलाईन एमसीक्यू स्वरूपात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ५८१ विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा होईल. कोणत्याही कारणास्तव गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा होणार नाही. पेपर रद्द आणि पुनर्परीक्षेच्या आयोजनाबाबतची माहिती सर्व संलग्नित विधी महाविद्यालयांना दिली असल्याचे परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

पुढारी

# १३९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेचे आजअखेर १३९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. सोमवारी बीएस्सी., बीए., एमबीए., एम.ए..बीई., बीए बीएड., बी.आर्किटेक्चर आदी २९ विषयांच्या परीक्षा झाल्या. १५ हजार ६०९ विद्यार्थी परीक्षेला बसले. दरम्यान, विद्यापीठातर्फे सोमवारी ८ परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले. यात एम.स्सी., बीआयडी या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात 'टूर अँड ट्रॅव्हल्स' विभाग व्हावा



कोल्हापूरला लागून कोकण, कर्नाटक असल्याने पर्यटनासाठी खूप वाव आहे. प्रत्येकजण आपापल्या क्षेत्राचा विचार करताना समन्वय महत्त्वाचा आहे. एमटीडीसीची हेल्पलाईन किंवा टोल-फ्री क्रमांक दिल्यास पर्यटनस्थळांची माहिती लोकांपर्यंत पोहोचेल. हंगामानुसार स्थळांचे माहिती फलक लावण्याची गरज आहे. राज्यात केवळ औरंगाबाद विद्यापीठ वगळता कोणत्याही विद्यापीठात 'टूर अँड ट्रॅव्हल्स' विभाग नाही. शिवाजी विद्यापीठात अशाप्रकारे विभाग असणे गरजेचे आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाने प्रयत्न करावेत.

– **प्रा. मीना पोतदार**, समन्वयक, सहायक पीजी डिप्लोमा टूर अँड ट्रॅव्हल्स